# प्रस्तावना

पोलिसांच्या दैनंदिन कामकाजात नेहमी लहान मुले,महिला,तरुण मुले व जेष्ठ नागरिक यांच्याशी सातत्याने संबंध येत असतो त्यामुळे त्यांच्याशी संवेदनशीलपणे लागते,बऱ्याच वेळी दैनंदिन कामकाज दरम्यान अनावधानाने पोलीस अम्मलदारांकडून लहान मुले,तरुण,महिला ,जेष्ठ नागरिक यांना चांगली वागणूक दिली जात नाही.

जनतेच्या पोलिसांप्रती असलेल्या प्रमुख तक्रारी म्हणजे पोलिसांनी चांगली वागणूक दिलेली नसणे त्यामुळे पोलिसांनी आपल्या वागणुकीत सकारात्मक बदल करणे अपेक्षित आहे पोलिसांनी समाजात वापरताना लहान मुले,तरुण मुले ,महिला व जेष्ठ नागरिक यांच्याशी आदराने वागल्यास जनतेच्या मनात आपली प्रतिमा उंचावू शकते

**प्रकरण १:-**

# पोलिसांची लहान मुलांबाबरोबर वागणूक.

पोलीस दलात दैनंदिन कामकाजा दरम्यान समाजातील सर्व स्तरातील लोकांशी पोलीस अमंलदारांचा संबंध येतो. त्या सर्व संबंधापैकी सर्वात नाजुक,सवेंदनशील व भावनिक स्वरूपाचे संबंध लहान मुलाशी येतात.मुलाशी येणारे संबंध हे वैविधयपूर्ण असतात तसेच त्यात मुलांची वेगवेगळ्या स्वरूपातील मानसिकता व त्याचे वय यांचा विचार करून संबंधीत मुलाशी संवाद प्रस्तापित करणे अगत्याचे ठरते .या पाश्ववभूमीवर सर्व मुलांची स्थिती व त्याच्याशी येणारा संबंध समजावून घेवून व त्या अनुषंगाने कौशल्याचा उपयोग करून अत्यंत हळुवार व संवेदनशीलतेने आपले कर्तव्य पार पाडणे आवशयक असते. दैनंदिन कामकाजादरम्यान मुलांशी संबंध त्याची विशेष काळजी पोलीस अंमलदाराने घेणे अगत्याचे ठरते. पोलीस ठाण्यात काम करत असताना पोलीस अंमलदाराने मुलांशी सदारणतः खालील स्वरूपाचे संबंध येतात व त्या अनुषंगाने त्याने वेगवेगळ्या पद्धतीने परिस्थितीनुरूप आपले कर्तव्य काळजीपूर्वक व कुशलतेने हाताळावे व त्यासाठी खालील प्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.

## 1. हरवलेली मुले मळुन आल्यास :-

**1.1** हरवलेली मूले विविध माध्यमातून पोलीस ठाण्यापर्यंत पोहचतात जसे समाजातील जागरुक व्यक्ती, समाजसेवी संस्था, पोलीसांची दैनंदिन गस्त, प्रसारमाध्यमातील जाहिराती इत्यादी. यामाध्यमातुन मिळून आलेल्या मुलांची कौशल्याने विचारपूस करून त्यांच्या नातेवाईकांचा शोध घ्यावा व त्यांना त्यांच्या ताब्यात दयावे. सदर चौकशी दरम्यान मुलांशी आपले वर्तन हळुवार, संवेदनशील व आपुलकीचे असावे जेणेकरुन पोलीसांबद्दल लहान मुलांच्या मनात असलेली भिती नाहीशी होवून त्याऐवजी त्यांच्या मनात पोलीसांबद्दल विश्वास व प्रेम उत्पन्न होइल व त्यामूळे सदर निर्भयपणे आपली माहिती पोलीस अंमलदारास सांगतील .

**1.2** विकलांग व मतीमंद मुलेभमळुन आल्यास सदर मूलांशी संवाद साधने अत्यंत अवघड असते व त्यामूळे पोलीस अमलदाराने उच्य सहनशीलतेचे प्रदर्शन करून दुभाषिकांमार्फत ,तज्ञांच्या मदतीने त्यांच्याकडून त्यांच्या पालकांची माहिती मिळवण्याचा प्रयत्न करावा. सदरवेळी अशा मुलांना पोलीसांकरवी सहानुभूतीपूर्वक व हळूवार वागणूक दिली जावी.

## 2. भरकटलेली व व्यसनाधीन मुले:-

**2.1** समाजातील व व्यसनाधीन तेच्या आहारी गेलेली व भरकटलेली मुले आपल्या कार्यक्षेत्रात आढळून आल्यास सदर मूलांच्या पुनर्वसनासाठी त्यांना समुपदेशनाची गरज भासते. अशा मुलांनां सामाजिक सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून समुपदेशन उपलबध करून देण्याच्या प्रयत्न करावा। बऱ्यचवेळा वेगवेगळ्या गुन्हेगारी कृत्यात शिताफीने त्यांचा वापर करून घेता. अशावेळी सदर गुन्हेगारावर कायदेशीर कार्यवाही करून त्यात अडकलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी कायदेशीर मार्गाने प्रयत्न करावे.

**2.2** वरील परिस्थितीत जिल्हा बालकल्याण अधिकारी यांना माहिती देऊन सादर मुलांच्या पुनर्वसनचा प्रयत्न करावा तसेच वेगवेगळ्या नामांकित गैरसरकारी सेवाभावी संस्थांचीही मदत घ्यावी .

## 3. साक्षीदार मुले:-

**3.1** लहान मूलांची बूध्दी चौकस असते व सभोवतालच्या परिस्थितीबाबत त्यांच्या मनात नैसर्गिकपणे सतत उत्सूकता असते त्यामूळे आजूबाजूला झालेल्या घटनांचा त्यांच्या मनावर तात्काळ व खोलवर परीणाम होतो. या गोष्टीचा पोलीसांना तपासादरम्यान चांगला फायदा होवू शकतो. सदर मूलांशी त्यांच्यात मिसळून व आपण त्यांच्यातलेच त्यांचे मित्रच आहोत असे भासवून संवाद प्रस्तापित केल्यास त्याकडून बरीच महत्वपूर्ण माहिती मिळू शकते.

**3.2** सदर साक्षीदार मूलांची चौकशी त्यांच्या पालकासमोर व त्यांच्या घरी व घरी शक्य नसल्यास त्याच्या पसंतीच्या ठिकाणी जावून करावी. (सी. आर. पी. सी. कलम 160) सदर चौकशी दरम्यान पोलीस अमलदाराने साध्या कपडयात असावे व त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत, प्रश्नोत्तर स्वरूपात त्यांच्याशी संवाद साधुन माहिती घ्यावी. सदर मुलांशी पोलीस अमलदाराचे वागणे अंत्यंत संवेदनशील व प्रेमळ असावे.

## 4. बालगुन्हेगार-:

**4.1** बऱ्याच वेळा पोलीसांचा बाल गुन्हेगारांशी संपर्क येतो अशावेळी त्यांच्याशी पोलीस अमलदाराची वागणुक सहानुभूतीपूर्वक व संवेदनशील असली पाहीजे. बालगून्हेगाराना बालसुधारगृहातच ठेवले पाहिजे (बालसंरक्षण अधिनियम 2004) . त्यांच्यासोबत नेहमी साध्या कपडयात रहावे तसेच त्यांना बेडया घालू नये.

**4.2** त्यांना वैदयकीय मदतीची गरज असल्यास तात्काळ उपलब्ध करून दयावी.

**4.3** पोलीस ताबेदारी त त्यांचा संपर्क मानसिक किंवा शारीरिक होणार नाही याची काळजी घ्यावी . कोणत्याही प्रकारची जोरजबरदस्ती न करता त्यांच्याशी संवाद कौशल्याचा उपयोग करून व हुशारीने माहिती व पुरावा मिळवावा.

**प्रकरण 2:-**

# पोलिसांची जेष्ठ नागरिकांसोबतची वागणूक

पारंपरिक भारतीय समाजात पूर्वीच्या काली एकत्र कुटुंब व्यवस्था अस्तित्वात होती व सदर कुटुंब व्यवस्थेत जेष्ठांना सर्वोच्य स्थान प्राप्त होते. त्यामुळे आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांची काळजी सर्व कुटुंबामार्फत एकत्रितपणे घेतली जात अस.पण आधुनिक समाजात विभक्त कुटुंब व्यवस्थेत जेष्ठांना दुय्यम स्थान प्राप्त झाले याचा परिणाम म्हणून त्याच्या समस्यांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली एकटा जेष्ठ नागरिक राहणारे घर हे नेहमी अपराध्यांसाठी सोपे लक्ष ठरते व त्यामुळेच त्यांच्या सुरक्षेचा गंभीर बनतो

समाजात साधारणतः ६५ वर्ष पेक्षा जास्त वय असलेले नागरिक हे आयुष्यसायच्या शेवटच्या टप्प्यात आलेले असतात.आयुष्याच्या सायंकाळी शारीरिक व मानसिक दृष्ट्या थकलेले अस्तरात म्हणून पोलीस अंमलदाराने आपले कर्तव्य पार पडत असतांना सदर जेष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेणं आवश्यक आहे। सदर जेष्ठ नागरिकांची मदतीसाठी पोलिसानकडून खालील उपाय -योजना राबविल्या जाऊ शकतात.

1.कुटुंबापासून लांब व एकटे राहणारे, अपंग विविध दुर्धर व्याधी ग्रस्त ,मानसिकदृष्ट्या कमकुवत अशा जेष्ठ नागरिकांची पोलीस स्टेशन हद्दीत बिटप्रमाणे यादी तयार करून त्यांचे पत्ते,फोन नंबर ठेवून तसेच त्यातील अति गरजवंत जसे विरळ वस्तीत एकटे राहणारे वृद्ध ,शारीरिक हालचाल न करता

यानांरे व अपंग वृद्ध इत्यादी याना आपल्या दैनंदिन गस्तीदरम्यान भेट देऊन त्यांची विचारपूस करावी व त्यांच्या अडीअडचणी समजून घेवून त्या सोडवण्यास मदत करावी

2.अशा निराधार जेष्टांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण प्राथमिकतेने व तात्परतेनें प्रयत्न करणे आवश्यक आहेत सदर कार्यासाठी आपण विविध सरकारी व बिगर सरकारी सेवाभावी संस्थंची मदत घ्यावी.

3.जेष्ठा नागरिक आपली एखादी समस्या घेवून पोलीस स्टेशनला आल्यास,आपुलकीने त्यांची विचारपूस करून,त्यांना प्राधान्याने वेळ देऊन त्याच्या अडीअडचणी समजून घेवून त्या तात्काळ सोडविण्यासाठी प्रयत्न करावे.

4.पोलिसांचे दैनंदिन कर्तव्य पार पडताना जसे गस्त,रात्रगस्त,वाहतूक नियमन,नाकाबंदी इत्यादी पार पडताना आपणास वेळोवेळी जेष्ठ नागरिक आढळल्यास प्राधान्याने मदत करावी वाहतूक उदा :वर्दळीच्या रास्ता ओलांडताना ,सार्वजनिक वाहतुकीचे साधन मिळवून देताना किंवा वैद्यकीय मदतीची गरज उत्पन्न झाल्यास.

5.पोलीस ठाण्यात व दैनंदिन कामकाजाच्या दरम्यान पोलीस अंमलदाराने आपल्या संपर्कात येणाऱ्या -प्रत्येक जेष्ठ नागरिकाला आदराने वागविणे अपेक्षित आहे त्याच्याशी संभाषण करताना मन देऊन बोलावे जसे तू ऐवजी तुम्ही किंवा आपण असे संबोधावे तसेच आपल्यांवागण्यातून त्याच्या प्रति आदर प्रकट होईल याची काळजी घ्यावी उदा:ते आल्यावर उठून उभे राहणे ,त्यांचे आदराने स्वागत करणे ,त्यानां प्राधान्याने सेवा देणे व आदराने निरोप घेणे इ.

- **दत्तक योजना-:**जेष्ठाना मदत कर्तनानं एक वैविध्यपूर्ण अशी योजना म्हणून दत्तक योजनेचा विचार पोलीस प्रशासनामार्फत केला जाऊ शकतो आपल्या पोलीस स्टेशन हाडदडीतील अतिगरजवंत व एकटे राहणाऱ्या वृद्धांना मदत करण्यासाठी प्रत्यक्ष अशा वृद्धांसाठी एक पोलीस अंमलदार किंवा बीटसाठी बिटप्रमाणे बिट अंमलदार याना पालकत्त्व वाटून द्यावे जणू काही त्यांनी सदर वृद्धना सांभाळण्यासाठी दत्तकच घेतले सदर योजनेमुळे वृद्धावर होणारे गुन्हेगारी स्वरूपाचे अन्यायांना प्रतिबंध होईल व त्यामुळे पोलिसांची जनमानसातील प्रतिमा देखील उजाळेल दत्तकच घेतलेआहेसदर. योजनेमुळे वृध्दांवर होणारेगुन्हेगारी स्वरुपाचेअन्यायांना प्रभतबंध होईल व त्यामुळेपोलीसांची जनमानसातील प्रभतमा देभखल उजाळेल.

**प्रकरण 3:-**

# पोलिसांची विद्यार्थांसोबतची वागणूक

**विद्यार्थी :-**

- काही वेळा विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचा प्रसंग येतो ,तेव्हा अत्यंत कौशल्याचा वापर करून प्रकरण हाताळावे
- प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालय व त्यांचे परिसरात घडलेल्या गुन्ह्यांचा तपस करण्याचा पोलिसांना अधिकार आहे
- कायदेशीर कारवाईच्या दूरगामी परिणामांची त्याना जाणीव करून द्यावी ,विद्यार्थ्यांनी रॅगिंग सारख्या गुण्यांमध्ये समाविष्ट होऊ नये म्हणून त्याचे पालक या नात्याने प्रबोधन व मार्गदर्शन करावे.
- दखलपात्र गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग असेल तर त्यांना विद्यापीठातून निष्कासित करण्यात येते व त्याचा भावी आयुष्यावर वाईट परिणाम होतो याची त्यांना जाणीव करून घ्यावी.



- ❖ समाजात साधारणतः ६५ वर्ष पेक्षा जास्त वय असलेले नागरिक जेष्ठ नागरिक म्हणून ओळखले जातात कर्तव्यावर पडत असताना सदर जेष्ठ नागरिकांची विशेष काळजी घेणं आवश्यक आहे त्यासाठी पोलीस अंमलदाराने पुढील प्रयत्न करावे
- सदर जेष्ठ नागरिक पोलीस स्टेशन ला मदतीसाठी आल्यांनतर। त्यांना प्राधान्याने वेळ देऊन त्याच्या आदी अडचणी सोडविण्यासाठी सर्वोतपरी मदत करावी

- पोलीस ठाण्यात व दैनंदिन कामकाजादरम्यान येणाऱ्या प्रत्यक्ष जेष्ठ नागरिकाला पोलीस अमलदाकडून आदराची वागणूक दिली पाहिजे.
- पोलीस हे मित्र व रक्षक आहे अशी सुरक्षितेची भावना त्याचे मनामध्ये निर्मण करावी.
- पोलीस ठाण्यात येणाऱ्या संकटग्रस्थ व त्यांच्या जिवाभावाच्या लोकांनी दुखावलेले असते किंवा त्यांनी जवळच्या लोकांना गमावलेले असते ,ते एकटे ,असहाय्य व मानसिकदृष्ट्या खचलेले असतात ,त्यामुळे त्यानां मानसिक आधार देणे अत्यन्त आवश्यक असते म्हणून पोलिसांनी त्याचेशी जवळकीचे नात्याने वागले पाहिजे.
- अशा जेष्ठ नागरिकांना पोलीस हेच एकमेव आधार आहेत असे वाटत असते सबब त्यांचे म्हणणे अत्यंत शांतपणे ऐकून घ्यावे.
- दैनंदिन कामकाज जसे रस्ते रहदारी ,गस्त ,वाहतूक नियमन ,नाकाबंदी ,कोंबिंग ओपेरेशन इत्यादी पार पाडताना वेळोवेळी जेष्ठ नागरिक आढळल्यास त्याना ताबडतोब सहानुभूतीपूर्वक मदत करावी.
- निराधार जेष्ठांच्या समस्यया सोडविण्यासाठी विविध सेवाभावी सामाजिक संस्थची मदत घ्यावी.



- कुटुंबापासून लांब राहणारे, अपंग ,विविध दुर्धर व्याधीग्रस्थ ,मानसिकदृष्ट्या कमकुवत अशा जेष्ठ नागरिकांची पोलीस स्टेशन हिट बिटप्रमाणे यादी तयार करून त्यांचे पत्ते, फ़ोन नंबर,फॅमिली डॉक्टरांनाच पत्ता व फ़ोन नंबर घेऊन ठेवावे तसेच आपल्या दैनंदिन गस्तीदरम्यान अशा गरजू वृद्धांना भेट देऊन त्यांची विचारपूस करावी त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांना त्या अडचणी सोडविण्यास मदत करावी.



- जेष्ठ नागरिकांनां समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न करावा
- त्याचेवर जास्तीत जास्त लक्ष ठेवावे त्यांना सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीचे साधन उदा,रिक्षा ,टॅक्सी ,बस मिळवून देणेची व्यवस्था करावी
- जरूर तेव्हा वैद्यकीय त्वरित उपलब्ध करून द्यावी.
- या लोकांना वेळेवर साहाय्य मिळाले तर तेही वेळप्रसंगी आपल्या उपयोगी आपल्या उपयोगी होतात.
- **दत्तक योजना** :-आपल्या पोलीस स्टेशन हद्दीतील अति गरजवंत वृद्ध मदत करण्यासाठी बिट अंमलदार किंवा पोलीस अंमलदार यांना नेमून दिले जाऊनही त्यांनी सादर वृद्धना सांभाळण्यासाठी दत्तक घेतले आहे

**प्रकरण ४ :**

# पोलिसांची महिलां बरोबरची वागणूक

- **पोलीस अंमलदाराने आपल्या दैनंदिन कामकाजात महिलांशी वागणुकीबाबत खालील काळजी घ्यावी**
- पीडित महिला तक्रार देण्यासाठी आल्यास पोलीस अंमलदाराने संवेदनशीलपाने त्यांची तक्रार ऐकून व त्याची दखल घेऊन कायद्याच्या व सामाजिक बांधिलकीची चौकटीत राहून योग्य ती मदत करावी
- महिलांशी आदरयुक्त भावनेने वागावे व आपल्या संभाषण कौशल्याने नम्रपणे वागून त्याच्या समस्या जाणून घ्याव्यात
- पीडित महिलेची तक्रार श्यक्यतो महिला पोलीस अधिकाऱ्यांनीच घ्यावी
- महिलेला समजेल अशा सोप्या भाषेत तिची तक्रार घ्यावी.
- तिला लज्जा उत्पन्न होईल असे संभाषण टाळवे.
- महिला पंचसोबत आदराने वागावे ,शिष्टाचाराने वागावे.
- महिला आरोपीची अंगझडती महिला पोलीस आमदारांमार्फत घ्यावी
- महिला आरोपीला अटक करताना महिला पोलीस अधिकारी किंवा महिला पोलीस कर्मचारी यांच्यामार्फत करावी
- . महिला आरोपी पोलीस कोठडीत अस्ताना तिचा ताबा महिला पोलीस कर्मच्याकडेच असावा



- अपवादात्मक परिस्थिती असल्याशिवाय महिला आरोपीस सूर्यास्तानंतर अटक करू नये.
- अपवादात्मक परिस्थिती असल्यास प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेऊनच अटक करावी.



- पोलीस कोठडीत असणारी महिला आरोपी जर स्तनदा माता असेल तिच्या बाळाला ठेवण्याची तजविज  करावी.
- ,महिला आरोपीची चौकशी करताना महिला पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या समक्ष करावी.
- महिला आरोपी किंवा तक्रारदार महिला यांची वैद्यकीय तपासणी महिला वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून करावी.
- महिला आरोपीचे तपास चौकशी दरम्यान तसेच पोलीस कोठडीत किंवा कारागृहात असतानां महिला  आरोपीशी कोणत्याही प्रकारची ताबेदारीतील हिंसा अथवा असभ्य वर्तन होणार्नाही यांची काळजी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी घ्यावी.